राज्याचे क्रीडा धोरण-२०१२

अनिवासी क्रीडा प्रबोधिनीची स्थापना

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः क्रीडाधो-३११३/प्र.क्र.४५/१३/क्रीयुसे-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

तारीख: २१ सप्टेंबर, २०१३

**वाचा :-**

१. समाज कल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग शासन निर्णय
   क्रमांक शाशिम १०९७/प्र.क्र.८४८/क्रीयुसे-१,दि.९ जुलै, १९९९
२. १९९९समाज कल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग शासन निर्णय
   क्रमांक शाशिम १०९५/प्र.क्र.१६६/क्रीयुसे-१,दि.१८ नोव्हेंबर, २००५.
३. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
   क्रमांक -क्रीडाधो-२०११/प्र.क्र.५५/क्रीयुसे-१, दिनांक १४ जुन,२०१२.

**प्रस्तावना :-**

राज्यातील उदयोन्मुख खेळाडूंसाठी निवासी क्रीडा प्रबोधिनीची योजना दिनांक १८ नोव्हेंबर,१९९५ च्या शासन निर्णयानुसार कार्यान्वित झाली आहे. यानंतर वसतीगृहात न राहता क्रीडा प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंसाठी अनिवासी क्रीडा प्रबोधिनीची योजना दिनांक ९ जुलै, १९९९ च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली. या योजनेचा उद्देश खेळाडूंना स्थानिक स्तरावर खेळाच्या उत्तम सुविधा व तांत्रिक प्रशिक्षण नियमित दिल्यास खेळाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल. पालक आपल्या पाल्यांना घरापासून लांब ठेवण्यास तयार नसतात, त्याचप्रमाणे पुणे व कोल्हापूर येथील शूटींग या खेळातील अनिवासी क्रीडा प्रबोधिनीचे यश लक्षात घेवून क्रीडा धोरण समितीने राज्यात अनिवासी क्रीडा प्रबोधिनी मोठ्या प्रमाणावर स्थापण्याची शिफारस केलेली आहे. या पार्श्वभूमीवर अनिवासी क्रीडा प्रबोधिनी योजना सुधारीत स्वरुपात लागू करण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती.

## शासन निर्णयः-

अनिवासी क्रीडा प्रबोधिनी योजनेचा उपरोक्त दिनांक ९ जुलै, १९९९ चा शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येवून खालील विहित केलेल्या तरतूदीस अनुलक्षून अनिवासी क्रीडा प्रबोधिनी योजना नवीन स्वरुपात कार्यन्वित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**१) प्रवेशाची पध्दत :-**

i. अनिवासी क्रीडा प्रबोधिनीमध्ये प्रवेशाकरिता अधिकृत राज्य/राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त करणाऱ्या खेळाडूंचा प्राधान्याने प्रवेश देण्यात येईल. इतर खेळाडूंची त्यांच्या क्रीडा प्रकारानुसार विविध कौशल्याची चाचणी घेण्यात येईल व त्या आधारे सदर खेळाडूंचे प्रवेशाबाबत निर्णय घेण्यात येईल.

ii. सदर योजनेअंतर्गत शासनामार्फत अनिवासी क्रीडा प्रबोधिनी प्रवेशासाठी तयार करण्यात आलेले सध्याचे व भविष्यात सुधारणा होणारे निकष हे बंधनकारक राहतील.

iii. अनिवासी क्रीडा प्रबोधिनीमध्ये प्रवेश देण्यात आलेले खेळाडू हे क्रीडा प्रबोधिनीचे खेळाडू संबोधण्यात येतील. ते ज्या शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेत आहेत त्या संस्थेचे खेळाडू समजण्यात येणार नाहीत. तसे बंधपत्र सदर खेळाडूने संचालक, क्रीडा व युवक सेवा यांना सादर करणे बंधनकारक राहील.

**२) <u>अनिवासी प्रवेशित खेळाडूंना देण्यात यावयाच्या सोयी-सुविधा</u>**

i. क्रीडा प्रबोधिनीतील क्रीडा सुविधा / सरावाकरिता उपलब्ध करुन देणे येतील.

ii. तज्ञ प्रशिक्षक उपलब्ध करुन देण्यात येतील.

iii. प्रशिक्षणाकरिता लागणाऱ्या क्रीडा साहित्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

iv. क्रीडा गणवेश व स्पोर्टस् कीट उपलब्ध करुन देण्यात येईल.

v. प्रशिक्षणार्थी सकाळी २ ते ३ तास व सायंकाळी २ ते ३ तास प्रशिक्षणाकरीता येतील. त्यावेळी त्यांना निवासी खेळाडू प्रमाणे योग्य पौष्टिक आहार देण्याची क्रीडा प्रबोधिनीत व्यवस्था करण्यात येईल.

vi. अनिवासी प्रवेशित खेळाडूंना सर्व स्पर्धामधून भाग घेण्याकरीता सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.

vii. अनिवासी क्रीडा प्रबोधिनीत प्रवेशित खेळाडू आपल्या घरी राहतील व त्याचा शैक्षणिक उपक्रम स्वखर्चाने चालू ठेवतील.

३) <u>अनिवासी क्रीडा प्रबोधिनीस मान्यता -</u>

ज्या ठिकाणी शासन संचालीत क्रीडा प्रबोधिनी आहेत त्या ठिकाणी प्राधान्याने अनिवासीक्रीडा प्रबोधिनी सुरु करण्यास परवानगी देण्यात येईल. मात्र ज्या ठिकाणी यापुर्वीच अनिवासी क्रीडा प्रबोधिनी सुरु आहे त्या ठिकाणी नव्याने त्याच खेळाकरिता नवीन अनिवासी क्रीडा प्रबोधीनीची परवानगी देता येणार नाही. ज्या ठिकाणी निवासी क्रीडा प्रबोधिनीची सोय उपलब्ध नाही किंवा विशिष्ट खेळांसाठी आवश्यक असणा-या सोयी सुविधा उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी खालील विहित अटी व सोयी सुविधा उपलब्ध असणा-या नोंदणीकृत संस्थाना अनिवासी क्रीडा प्रबोधिनी सुरु करण्यास परवानगी देण्यात येईल.

i. सदरची संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अथवा मुंबई धर्मादाय आयुक्त अधिनियम १९६० च्या कायद्यानुसार नोंदणीकृत असावी.

ii. सदरच्या संस्थेने २ ते ५ वर्षे क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले असावे.

iii. संस्थेची आर्थिक स्थिती उत्तम असावी त्या पृष्ठ्यर्थ मागील दोन वर्षाचे ताळेबंदपत्रक सनदी लेखापालाने प्राधिकृत केले असले पाहिजे.

iv. ज्या संस्थेने ज्या खेळासाठी अनिवासी प्रबोधिनीची मान्यता मागीतली आहे. त्याच्याकडे त्या खेळासाठीच्या सर्व पायाभूत व इतर सोयी सुविधा उपलब्ध असणे अत्यावश्यक आहे व या सोयी सुविधा त्या संस्थेकडे असल्याची खातरजमा संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा प्रमाणित करावयाचे आहे.

v. प्रत्येक जिल्ह्यात शक्यतो एकच अनिवासी क्रीडा प्रबोधिनी असावी. त्याचप्रमाणे एकूण प्रशिक्षणार्थ्यांची संख्या २५ पेक्षा जास्त नसावी. मात्र दुस-या खेळासाठी मागणी आल्यास यासाठी गठीत समितीचा निर्णय अंतिम राहील.

vi. एका खेळासाठी एकापेक्षा जास्त संस्थांची मागणी आल्यास गुणवत्तेनुसार या प्रयोजनार्थ नेमलेली समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

४) <u>अनिवासी क्रीडा प्रबोधिनीस मान्यतेसाठी समिती -</u>

i. मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण - अध्यक्ष

ii. मा.राज्यमंत्री, क्रीडा व युवक कल्याण-उपाध्यक्ष

iii. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग -सदस्य

iv. उपसंचालक, शिवछत्रपती क्रीडापीठ बालेवाडी पुणे -सदस्य

v. आयुक्त / संचालक, क्रीडा व युवक सेवा -सदस्य सचिव

सदरची समिती या शासन निर्णयामधील विहित केलेल्या तरतूदीस अधिन राहून गुणवत्तेनुसार अनिवासी क्रीडा प्रबोधिनीना मान्यता देतील. याबाबत आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा त्यांना प्राप्त झालेले प्रस्ताव त्यांच्या शिफारशीसहित या समितीपुढे आदेशार्थ सादर करतील.

**५) <u>अनुदानाच्या अनुज्ञेय बाबी-</u>**

i. प्रबोधिनीचे प्राचार्य व प्रशिक्षक यांच्या मानधनावरील शासन दराप्रमाणे येणाऱ्या खर्चाची ५० टक्के रक्कम क्रीडा प्रशिक्षकांचे मानधन हे मासिक रु.१५,०००/- इतके असेल.

ii. योग्य दप्तरी नोंदीचे आधारे प्रत्येक खेळाडू यांच्या अल्पोपहारावरील खर्च ते हजर असलेल्या प्रत्येक दिवसासाठी रु.५०/- या मर्यादेत देण्यात येईल.

iii. इमारत भाडे- सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित केलेलया भाडयाच्या ५० टक्के.

iv. प्रशिक्षण वर्ग अनिवासी क्रीडा प्रबोधिनीमध्ये नियुक्त करण्यात यावयचाच्या प्रशिक्षक वर्गास संचालक, क्रीडा व युवक सेवा यांचे मार्फत क्रीडापीठाची मान्यता आवश्यक राहील. मान्यता दिलेलया प्रशिक्षकांवर शासन दराच्या ५० टक्के अनुदान अनुज्ञेय होईल. खेळनिहाय प्रशिक्षक अनुज्ञेय राहील. सर्वसाधारणपणे २५ प्रशिक्षणार्थीसाठी एक प्रशिक्षक नियुक्त करता येईल क्रीडापीठाच्या मान्यतेने वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करता येईल.

v. अनिवासी क्रीडा प्रबोधिनी जर शासनाच्या क्रीडा संकुल योजनेमध्ये गठीत संकुल समितीने चालविल्यास वर नमूद केलेले अनुदान हे १०० टक्क्यांप्रमाणे देय राहील.

**६) <u>क्रीडापीठामार्फत पुरविण्यात यावयाच्या सोयी- सुविधा -</u>**

i. अनिवासी क्रीडा प्रबोधिनीसाठी मागणीनुसार व आवश्यकतेनुसार तज्ञ क्रीडा मार्गदर्शक,मदतनीस यांची क्रीडा पीठामार्फत नेमणूक करण्यात येईल.

ii. अनिवासी क्रीडा प्रबोधिनीस आवश्यक ते साहित्य त्यांचे मागणीनुसार क्रीडा प्रशिक्षणाकरीता क्रीडापीठामार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल व सदरील माहितीची मालकी क्रीडापीठाची राहील. अनिवासी क्रीडा प्रबोधिनीची मान्यता रद्द झाल्यास साहित्य परत करणे हे प्रबोधिनीवर बंधनकारक राहील.

iii. अनिवासी क्रीडा प्रबोधिनीतील खेळाडूंना खेळाचा गणवेश व स्पोर्टस कीट क्रीडापीठामार्फत देण्यात येईल.

iv. अनिवासी क्रीडा प्रबोधिनीतील खेळाडूंना विविध स्पर्धामध्ये भाग घेण्यासाठी येणारा खर्च (प्रवास,निवास,भोजन व दैनंदिन भत्ता) क्रीडापीठामार्फत देण्यात येईल.

(७) **निरीक्षण/नियंत्रण पध्दती -**

i. अनिवासी क्रीडा प्रबोधिनीस मान्यता दिल्यानतर शासन वा शासनाचे प्रतिनिधी, क्रीडापीठ यांचे मार्फत वेळोवेळी निरीक्षण करण्यात येईल व त्यावेळी त्यांनी मागणी केल्यानुसार निरीक्षणासाठी अभिलेख व इतर बाबी उपलब्ध करुन देणे संस्थेस बंधनकारक राहील. निरीक्षणात आढळलेल्या त्रुटींची त्वरीत पूर्तता करणे संस्थेवर बंधनकारक राहील. आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचेकडून वेळोवेळी आवश्यकतेनुसार जे निदेश दिले जातील त्यांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील. तत्संबधी काही दुमत झाल्यास शासनाचा निर्णय अंतिम राहील.

ii. क्रीडापीठाचे सर्व नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.

iii. अनिवासी क्रीडा प्रबोधिनी मान्य झालेल्या संस्थेने आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा यांचे बरोबर, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारे विहित केल्या जाणाऱ्या बंधपत्रावर योग्य तो करारनामा करुन द्यावा लागेल.

iv. शासनाने मान्यता दिलेल्या अनिवासी क्रीडा प्रबोधिनीमध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी आढळल्यास व त्याची पुर्तता न केल्यास, गैरव्यवहार झाल्यास/निदर्शनास आल्यास किंवा शासनाच्या अनुदानाचा गैरवापर होत आहे आढळून आल्यास किंवा कोणत्याही विशिष्ट परिस्थितीत/प्रसंगी सदर प्रबोधिनीची मान्यता काढणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाल्यास १ महिन्याची पूर्व सूचना देऊन सदर प्रबोधिनीची मान्यता शासन रद्द करेल. त्यासाठी संस्थेस शासनामार्फत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

८) **खेळाडूंच्या कामगिरीचे मुल्यांकन -**

दरवर्षी प्रवेश देण्यात आलेल्या खेळाडूंच्या कामगिरीची क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत नियुक्ती केल्या जाणाऱ्या तज्ञांचे समितीमार्फत तपासणी करण्यात येईल. या समितीमध्ये संबधित खेळाचे राज्य क्रीडा मार्गदर्शक व राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पदक विजेते, संबधित प्रबोधिनीचे प्राचार्य तसेच क्रीडा विभागाचे अधिकारी यांचा समावेश

असेल. खेळाडूची कामगिरी योग्य असण्याचे निदर्शनास आल्यास व समितीने शिफारस केल्यास संबधित खेळाडूचा प्रवेश सुरु ठेवण्यात येईल अन्यथा सदर खेळाडूंचा प्रवेश रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

या शासन निर्णयातील तरतूदी निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील व त्यात बदल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

या योजनेसाठी होणारा खर्च लेखाशिर्ष २२०४ क्रीडा व युवक सेवा, १०४ क्रीडा व खेळ, (३३) क्रीडा विद्यापीठ व क्रीडा अकादमी, (३३)(०२) जिल्हास्तरावर अनिवासी क्रीडा अकादमी स्थापन करणे (२२०४ ५३९५) या खाली उपलब्ध होणाऱ्या अर्थसंकल्पित तरतूदीतून करावा. त्यासाठी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय नियोजन विभागाची सहमती तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.अनौसं-३९९ /व्यय -५ , दिनांक १५.४.२०१३ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०९२३१११२०५४०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajshekhar Chandrakant Patil

Digitally signed by Rajshekhar Chandrakant Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajshekhar Chandrakant Patil
Date: 2013.09.23 11:24:18 +05'30'

(रा.चं.पाटील)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

२. मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,

३. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,

४. संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे,

५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,

६. महालेखापाल (लेखा परीक्षण), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,

७. नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई,

८. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,

९. सर्व एकविध राज्य संघटना व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन (संचालनालयामार्फत)

१०.सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत),

११.सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत),

१२.ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई,

१३.मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

१४.मा.राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

१५.निवड नस्ती (क्रीयुसे-१, क्रीयुसे-२ व क्रीयुसे-३).